REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 9 | ISSUE - 6 | MARCH - 2020

# भारतातील शेतमजूरांच्या आर्थिक समस्या – "एक विश्लेषणात्मक अभ्यास"

प्रा. डॉ. सिरास भैयालालजी कटमुसरे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालय, कुही, जि. नागपूर, महाराष्ट्र, भारत.

## प्रस्तावना :-

भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान असून देशाच्या स्थुल उत्पादनात 2009-10 मध्ये 15.7 प्र.श. वाटा आहे. तर एकुण रोजगारीत 58.2 प्र.श. वाटा कृषीक्षेत्राचा आहे. एकुण लोकसंख्या वाढीबरोबर शेतमजूरांची संख्या स्वातंत्र्याच्या काळात वाढतांना दिसते. 2002-2007 ते 2010-11 मध्ये श्रमपूरवठ्यातील प्रतीवर्ष वाढ 2.42 प्र.श. वरुन 1.78 प्रमाण वर आले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतमजुराचे प्रमाण एकूण कामगारांच्या तुलनेत 92 प्र.श. आहे. असंघटीत कामगारापैकी शेतकी कामगार 61 प्र.श. आहे. पैकी शेतमजूर आणि शेतकरी यांचे प्रमाण प्रत्येकी 34 प्र प्र.श. आणि 66 प्र.श. दिसते आहे. शेतकऱ्यांमध्ये अत्यल्प आणि सिमांत शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. शेती क्षेत्राविषयीच्या 2004-05 या वर्षात भारताची 77 प्र.श. जनता 20 रु. हूनही कमी रोजगारावर गुजराण करत होती. शेतमजूरांची ही स्थिती अतिशय बिकट आहे. त्यांची रोजची मिळकत प्रतिव्यक्ती सरासरी रु. 17 पैकी 60 पैसे खाण्यावर, 18 पैसे दळणवळण, प्रवास व कपडे इ. साठी, औषध पाण्यासाठी दररोज सरासरी 1 रुपया ता शिक्षणावर होणारा खर्च सरासरी 50 पैसे आहे. या दृष्टीने भारतातील शेतमजूरांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन करणे आवश्यक ठरते.

## शेतमजूराचा अर्थ :-



1950-51 मधील शेतमजूर चोकशी समितीच्या मते, " जे वेतनावर पीक घेण्यासाठीच्या कार्यात सहभागी होतात त्यांना शेतमजूर म्हणतात." तसेच जे 50 प्र.श. किंवा त्यापेक्षा अधिक दिवस दैनिक मजूरीवर शेतात काम करतात त्यांना शेतमजूर म्हणतात, शेतात काम करण्यासाठी वेतन देऊन कामावर ठेवले जाते त्यांना शेतमजूर म्हणतात. " आपल्या रोजगाराच्या तात्पुरत्या संधीमूळे अज्ञान, अशिक्षीतपणा, कामाचे विखुरलेले स्वरुप यामूळे आपले सर्वांचे कोणत्या गोष्टीत फायदे आहेत हे जाणण्यासाठी संघटित स्वरुपात एकत्र येण्याची शक्यता या कामगारांमध्ये नसते, त्यांना शेतमजूर म्हणतात.

### शेतमजूरांची वैशिष्ट्ये :-

> मिळणारे अत्यल्प उत्पन्न.
> उत्पन्नाचे अनेक मार्ग पण कामाचे तास अधिक.
> हक्क नाकारले जातात, त्यामूळे समाजात प्रतिष्ठा नसते
> कामाच्या जागी सुरक्षीतता नसते.
> वागणूक अपमानास्पद दिली जाते.
> शेतमजूर निरक्षर, अकूशल असून, कौशल्य नसते.
> शेतमजूर हक्कासाठी संघर्ष करीत नाहीत.

### उद्दिष्टये :-

> अध्यापेक्षा जास्त उत्पन्न हे शेती क्षेत्रातून येत असल्यामूळे या क्षेत्रातील मजुरांचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे,
> शेतमजूरांच्या संख्यात्मक व गुणात्मक पूरवठ्याचा अभ्यास करणे.
> कृषी उत्पादन वाढीसाठी शेतमजूरांची भूमिका तपासण्यासाठी.
> विदेशी व्यापारात आपला देश किती सक्षम आहे हे तपासण्यासाठी.
> शेतमजूरांच्या अर्थिक समस्यांवर प्रकाश टाकणे.
> शेतमजूरांच्या तुटवड्यामूळे निर्माण झालेल्या समस्यांचा शोध घेऊन उपाय सुचविणे,
> शेतमजूरांच्या मानव विकासाची स्थिती तपासणे.

### गृहितके :-

> शेतमजूर असंघटीत आहे.
> बगायती क्षेत्रात वाढ झाल्यास, मजूरीत वाढ होते.
> शेतमजूरांसमोर अनेक आर्थिक समस्या आहेत.
> शेतमजूरांचा राहणीमानाचा दर्जा खालावलेला आहे.
> कायमस्वरुपी कामाची शाश्वती नाही.
> मानवी विकास कमी आहे.

### भारतातील संघटीत व असंघटीत क्षेत्राची सद्यास्थिती :-

उत्पादनाच्या क्षेत्रात 2005-06 मध्ये भारतात एकूण 170,70,820 असंघटित उत्पादन संस्था होत्या. पैकी 71 प्र.श. ग्रामीण भागात तर 29 प्र.श. शहरी भागात होत्या. या सर्व उत्पादन संस्थामध्ये 36442799 असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या संख्येत मागील 25 वर्षात कसे बदल होत गेले, याची कल्पना खालील तक्त्यावरुन यावी.

| वर्ष | संघटित कामगार | असंघटित कामगार | एकुण कामगार |
|---|---|---|---|
| 1983 | 24.01 (7.93) | 278.74 (92.07) | 302.75 |
| 1987-88 | 25.71 (7.93) | 298.58 (92.07) | 324.29 |
| 1993-94 | 27.37 (7.31) | 347.68 (92.69) | 374.45 |
| 1999-2000 | 28.11 (7.08) | 368.89 (92.91) | 397.00 |
| 2005-06 | 26.46 (7.54) | 358.45 (92.46) | 384.91 |
| 2011-12 | 27.22 (6.60) | 385.01 (93.40) | 412.23 |
| **सयुक्त वृध्दीदर** | **2.88** | **7.41** | **7.06** |

(स्त्रोत: Dhas A.L. and Helenm Social Security for unorganized Workers in India, MPRA-2008)

वरील तक्त्यावरुन स्पष्ट व्हावे की, भारताच्या (2005-06) वगळता एकुण श्रमसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. संघटीत क्षेत्रातील मजूरांच्या संख्येत (2005-06) वगळता सातत्याने वाढ होत आहे. असंघटीत क्षेत्रातील मजूरांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे.

## शेतमजूरांचा मानवी विकास :-

शेतमजुरांच्या मानवी विकासाची स्थिती पुढील प्रमाणे दिसून आली आहे

- शेती क्षेत्रात शेतमजुरांच्या उत्पन्नाचा विचार करता दारिद्रय रेषेच्या आसपास असणारे उत्पन्न आढळते. उत्पन्न कमी असूनही बचत करण्याची प्रवृत्ती वाढते आहे.
- शेतमजूर वर्गाचे शैक्षणिक मागासलेपण दिसते.
- शेतमजूरबचत गट किंवा तत्सम पध्दतीच्या संघटनामध्ये सामाजिक सहभाग दर्शवितांना दिसते.
- शेतमजूर आजारपणावर जास्त खर्च करतांना आढळत नाही.
- संकटकाळात मित्र, नातेवाईक तसेच संस्था हयांच्या कडून मदत घेतली जाते.

यावरुन स्पष्ट व्हावे की, कामगाराचे जीवन अद्यापही खालच्या स्तरावरचे असून त्यात सुधारणा करण्याची गरज आहे.

## शेतमजूरांच्या वाढत्या संख्येची कारणे:-

शेतमजुरांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे त्याची कारणे खालील प्रमाणे आढळून आले आहे.

1) कामाचे प्रासंगीक स्वरुप.

2) कामगाराचे अज्ञान,

3) कामाविषयी आपूलकी नाही

4) निरक्षता.

5) विखुरलेले कामगार.

6) उत्पादनाचे लहान प्रमाण.

7) कामामधील अनियमीतपणा.

8) शासनाचे धोरण.

9) शेतीकडे दुर्लक्ष.

## शेतमजुरांचा तूटवडा असण्याची कारणे :-

एकाबाजूने असंघटीत कामगारांची संख्या वाढत असतांनी शेतमजूरांचा तुटवड़ा का भासतो आहे. त्याची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. ती खालील प्रमाणे दिसून येते.

1) मागणी - पुरवठ्यात असमतोल.

2) जमीनधारक शेतमजूर

3) रोजगारीचे हंगामी स्वरुप

4) अल्पवेतन.

5) इतरत्र रोजगारीच्या वाढत्या संधी.

6) शासकिय सवलतीचा परिणाम

7) कामाचे स्वातंत्र्य

8) मजूर मिळविण्यासाठी स्पर्धा.

9) सुरक्षीतता व सोयी सवलती.

10) नागरीकरण.

11) महिला बचतगट.

12) कृषी हंगामात शेतमजूरांचा तुटवडा.

वरील कारणांमूळे शेतमजूरांचा तुटवडा निर्माण झाल्याचे आढळते. त्यामूळे कृषी क्षेत्रावर विपरीत परिणाम होऊन गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत.

## निष्कर्ष :-

> शेतमजूरांमध्ये स्त्रीयांचे प्रमाण अधिक आढळते.

> दारीद्रय, उपासमार, शिक्षणाचा अभाव, कामगार संघटनांचा अभाव असे एकंदर चित्र दिसते.

> सर्वाअधिक कामगार शेतीशी संबंधीत आहे.

> शेतकऱ्यांशी वार्षिक करार करुन शेतमजूरी करण्याचे प्रमाण कमी दिसते.

> शेतीकामापेक्षा इतर कामे करण्यास जास्त प्राधान्य दिले जाते.

> कृषी हंगामात मजूरांची जास्त टंचाई आढळली आहे.

> शेतकऱ्यांना जास्तीची मजूरी देणे परवडत नाही तर शेतमजूरांचे अधिक मजूरी मिळवून सुध्दा भागत नाही, असे दिसते.

**उपाय :-**

> प्रत्येक शाळेने एक गाव दत्तक घेवून शेतमजूरांना सुशिक्षीत करणे गरजेचे वाटते.

> सामाजिक संस्थांनी शिबीरे घेवून आरोग्य विषयक शिबीरे आयोजित करणे.

> शेतमजूरांचे कामाचे तास ठरवून द्यावे.

> जवळपास 90 प्र.श. कामगार वर्ग असंघटीत क्षेत्रात काम करते आहे. त्यांना कायद्याने संरक्षण मिळणे आवश्यक आहे.

> शेतमजूरांना हंगामी काम मिळते तेव्हा त्यांच्या कामासाठी पर्यायी व्यवस्था करुन द्यावी किंवा सेवा क्षेत्रात त्याच्या श्रमाचा उपयोग करावा.

**सारांश :-**

कृषी क्षेत्रातील शेतमजूर बहुसंख्य असले तरी दारिद्रय, अशिक्षितपणा, अप्रशिक्षित असल्याने ते असंघटीत आहेत. त्यामुळे त्यांना उद्योग क्षेत्राप्रमाणे सोयी सुविधांचा लाभ घेता येत नाही. कौटुंबिक जबाबदारी व अल्प मजूरी यांचा योग्य प्रकारे मेळ बसत नसल्याने शेतमजूरांना अन्य क्षेत्रातही मजूरी मिळवावी लागते. ती जर मिळानी नाही तर त्यातूनच जंगलतोड, दरोडेखोरी, लुटमार, चोरी असे अनैतिक क्रिया त्यांच्या हातून घडतात. म्हणून भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेला हातभार लावणाऱ्या या असंघटीत शेतमजूराकडे अधिक लक्ष देणे महत्वाचे आहे.

शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होण्यासाठी त्यांच्या उत्पन्न स्तरात लक्षणीय वाढ होणे गरजेचे आहे. तसेच शिक्षणाचा स्तर उंचावणे आवश्यक आहे. शेतमजुरांच्या आर्थिक अडचणींच्या काळात मदतीची व्यवस्था उपलब्ध करुन देणे हे देखील आवश्यक बाब आहे.

**ग्रंथसूची :-**

1. 2007, Raing J.L "Dry land farming in India: constraints and challenges" pointer publishers, Jaipur.

2. 2006, Dholakia and Lyengar "Export of Agricultural commodities From India" Himalaya publishing House, India"

3. 2006, Pandya, Kiran "Regional Development and Agricultural Wages, Himalaya publishing House, India.

4. 2005, Choubey, S. "Economic Reforms in India, Need Effects and suggestions" Sarup and Sons publishers, New Delhi.

5. 2005, सिंह सुदामा/सिंह राजीवकृष्ण -"भारतीय अर्थव्यवस्था" राधा पब्लिकेशन नवी दिल्ली.

6. 2004, Gupta K. R. (Ed) "Rural Development India" ATLANTIC publishers Ltd, New Delhi.

7. 2000, देसाई, स.श्री.मु./भालेराव निर्मल "कृषी अर्थशास्त्र" निराली प्रकाशन, पुणे.

8. 1999, खेर सी.प. "आर्थिक सुधारणांचे पर्व" दिलीप राज प्रकाशन, पुणे.

9. 2000, भोसले, के.एम/काटे, के.बी. "स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्था" फडके प्रकाशन, कोल्हापूर.

10. 1996, Tripathi, S.N."Agriculture Labour in India"New Delhi, Discovery pub.House.